**ठळक बातम्या**

ओबीसी समाजाचे प्रश्न सोडवण्यासाठी मंत्रिमंडळाची उपसमिती नेमण्याचा राज्य सरकारचा निर्णय / अनुसूचित जमातीतल्या इयत्ता नववी, दहावीच्या विद्यार्थ्यांना केंद्र सरकारची पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती योजना लागू करणार

जीएसटी कर परिषदेची ५६वी बैठक नवी दिल्लीत केंद्रीय अर्थमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली सुरु/ कररचनेत मोठ्या सुधारणांची शक्यता

नक्षलींचा बीमोड होईपर्यंत सरकार स्वस्थ बसणार नाही असा केंद्रीय गृहमंत्र्यांचा इशारा

सात दिवसांचे गणपती आणि गौरींना राज्यात सर्वत्र वाजतगाजत निरोप

**आणि**

अमेरिकन खुल्या टेनिस स्पर्धेच्या पुरुष दुहेरीत भारताचा युकी भांब्री न्यूझीलंडच्या मायकल व्हीनसच्या साथीनं उपांत्यपूर्व फेरीत दाखल

**<><><><>**

ओबीसी समाजाचे प्रश्न सोडवण्यासाठी मंत्रिमंडळाची उपसमिती नेमण्याचा निर्णय राज्य सरकारनं घेतला आहे. आज सह्याद्री अतिथीगृहात झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत हा निर्णय झाल्याचं मंत्री गुलाबराव पाटील यांनी सांगितलं. महायुतीतल्या तिन्ही पक्षांच्या प्रत्येकी दोन मंत्र्यांचा या समितीत समावेश असेल, अशी माहिती त्यांनी दिली.

राज्यात अनुसूचित जमातीतल्या इयत्ता नववी, दहावीच्या विद्यार्थ्यांना सुवर्ण महोत्सवी आदिवासी पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती योजनेऐवजी केंद्र सरकारची पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती योजना लागू करायला मंत्रिमंडळानं आजच्या बैठकीत मंजुरी दिली. संजय गांधी निराधार योजना तसंच श्रावणबाळ योजनेतल्या दिव्यांगांच्या अर्थसहाय्यात १ हजार रुपयांची वाढ करण्यात आली. असून लाभार्थ्यांना आता दरमहा दीड हजाराऐवजी अडीच हजार रुपये मिळणार आहेत.

मुंबईत आणिक डेपो- वडाळा ते गेटवे ऑफ इंडिया या मेट्रो मार्गिका प्रकल्पाला मंत्रिमंडळानं मान्यता दिली. त्यासाठी २३ हजार ४८७ कोटी ५१ लाख रुपयांची तरतूद केली आहे. मुंबई नागरी परिवहन प्रकल्पातल्या राज्य शासनाच्या ५० टक्के आर्थिक

सहभागालाही या बैठकीत मान्यता देण्यात आली. ठाणे वर्तुळाकार मेट्रो, पुण्यातल्या मेट्रो मार्गिका-२ आणि ४, तसंच नागपूर मेट्रोच्या दुसऱ्या टप्प्यासाठीच्या कर्जांनाही मंत्रिमंडळानं मान्यता दिली. पुणे मेट्रोवरच्या बालाजीनगर, बिबवेवाडी या दोन नवीन स्थानकांना मंजुरी देण्यात आली.

**<><><><>**

मराठा समाजाला ओबीसी प्रवर्गातून आरक्षण मिळावं या मागणीसाठीचं आंदोलन स्थगित केल्यानंतर आंदोलक आज मुंबईतून परतले आहेत. उपोषण मागे घेतल्यानंतर आंदोलनाचे नेते मनोज जरांगे छत्रपती संभाजीनगरच्या रुग्णालयात दाखल झाले आहेत

**<><><><>**

जीएसटी अर्थात वस्तू आणि सेवा कर परिषदेची ५६वी बैठक नवी दिल्ली इथे सुरू आहे. केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन बैठकीच्या अध्यक्षस्थानी आहेत. केंद्रीय अर्थराज्यमंत्री पंकज चौधरी तसंच अनेक राज्यं आणि केंद्रशासित प्रदेशांचे अर्थमंत्री या बैठकीत सहभागी होत आहेत.

करांचं सुसूत्रीकरण आणि कर विवरणपत्र भरण्याच्या प्रक्रियेचं सुलभीकरण, यासह नव्या जीएसटी सुधारणांबाबत या बैठकीत चर्चा अपेक्षित आहे. याबाबतची घोषणा प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी स्वातंत्र्यदिनाच्या भाषणात केली होती. जीएसटीचे फक्त ५ टक्के आणि १८ टक्के हे दोनच स्लॅब ठेऊन, १२ आणि २८ टक्क्याचे स्लॅब काढून टाकण्याचा निर्णय या बैठकीत होण्याची शक्यता आहे.

**<><><><>**

हैदराबाद गॅझिटियर लागू करण्याचा निर्णय हा कायद्याच्या चौकटीत घेतला असून कुणबी प्रमाणपत्र मिळण्याची प्रक्रिया सुलभ होणार असल्याचं उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज मुंबईत वार्ताहरांना सांगितलं. यामुळे ओबीसी प्रवर्गाचं नुकसान होणार नाही. जे ओबीसी नेते नाराज आहेत त्यांच्याशी मुख्यमंत्री आणि आपण चर्चा करू, वस्तुस्थिती समजल्यानंतर त्यांची नाराजी दूर होईल, असं शिंदे म्हणाले.

**<><><><>**

सेमिकॉन इंडिया २०२५ परिषदेच्या दुसऱ्या दिवशी आज प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी नवी दिल्लीमधल्या यशोभूमी इथं सेमिकंडक्टर क्षेत्रातल्या तज्ज्ञांशी संवाद साधला.

सेमिकंडक्टरशी संबंधित उत्पादनं आणि प्रकल्पांचीही त्यांनी पाहणी केली. इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्री अश्विनी वैष्णवही यावेळी उपस्थित होते.

प्रधानमंत्री मोदी आज सेमिकंडक्टर क्षेत्रातल्या उद्योगांच्या प्रमुखांच्या गोलमेज परिषदेत सहभागी होणार आहेत. या परिषदेत जगभरातील उद्योग प्रमुख उपस्थित असतील. भारतातील सेमिकंडक्टर परिसंस्था, तिची प्रगती आणि विकास यावर यात चर्चा होईल.

तीन दिवसीय सेमिकंडक्टर इंडिया २०२५ परिषदेचं काल प्रधानमं्त्र्यांच्या हस्ते उद्घाटन झालं.

**<><><><>**

नक्षलींचा बीमोड होईपर्यंत सरकार स्वस्थ  बसणार नाही असा इशारा देत ३१ मार्च २०२६ पर्यंत नक्षली चळवळ संपुष्टात येईल, असं केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी म्हटलं आहे. छत्तीसगडमध्ये नक्षलींविरोधातलं ऑपरेशन ब्लॅक फॉरेस्ट यशस्वीरीत्या राबवणाऱ्या सीआरपीएफ, छत्तीसगड पोलीस आणि कमांडोंचं शहा यांनी अभिनंदन केलं, त्यावेळी ते बोलत होते.   परिस्थिती प्रतिकूल असतानाही सुरक्षा दलांनी नक्षलींचे तळ उद्ध्वस्त केले, नक्षलविरोधी अभियानात जवानांना दाखवलेलं शौर्य इतिहासाच्या पानांवर सुवर्ण अक्षरात लिहिलं जाईल असे गौरवोद्गार शहा यांनी काढले.  या मोहिमेत गंभीर जखमी झालेल्या जवांना सरकार सर्वोतोपरी मदत करेल, असं आश्वासन शहा यांनी दिलं.

या मोहिमेत सुरक्षा दलांच्या कारवाईत ३१ नक्षली ठार झाले. २१ एप्रिल ते ३१ मे दरम्यान ही मोहीम राबवली गेली.

**<><><><>**

१२ हजार ५०० आरोग्य मंदिरांच्या स्थापनेमुळे आरोग्यसेवा ही ओपीडी पुरती सीमित न राहता प्रतिबंधात्मक उपचाराची सोयही झाल्याचं केंद्रीय आरोग्य आणि कुटुंबकल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी म्हटलं आहे. नवी दिल्लीत आयोजित आयुष अभियानाच्या विभागीय परिषदेला ते संबोधित करत होते. २३ सप्टेंबरला साजऱ्या होणाऱ्या आयुर्वेद दिवसाची संकल्पना जनता आणि जगासाठी आयुर्वेद अशी आहे. या अभियानात सर्व राज्यं आणि केंद्रशासित प्रदेशांनी सहभागी व्हावं आणि आयुर्वेदाचा संदेश जनतेपर्यंत पोहोचवावा असं आवाहन जाधव यांनी केलं.

आकाशवाणी मुंबई
प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता
३ सप्टेंबर २०२५ - बुधवार

<><><><>

सात दिवसांच्या गणपतींबरोबर काल राज्यभरात गौरींनाही निरोप देण्यात आला. पश्चिम महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भासह सर्वत्र गौरीपूजनाचा उत्साह दिसून आला. पर्यावरणपूरक पद्धतीनं गणेश विसर्जन करण्याबाबतही जागरुकता वाढत असल्याचं दिसून येत आहे. दहा दिवसांच्या गणपती विसर्जनाला तीन दिवस शिल्लक असल्यानं सार्वजनिक उत्सवातले  विविध देखावे पाहण्यासाठी ठिकठिकाणी गर्दी होत आहे.

दरम्यान, गणपती मूर्ती विसर्जन करण्याऐवजी त्या संकलित करण्याचा उपक्रम अनेक जिल्हा प्रशासनांकडून राबवण्यात येत आहे.

पिंपरी चिंचवड महापालिका आणि स्वराज्य महाराष्ट्र या संस्थेच्या वतीनं मूर्तिदानाविषयी जनजागृती करण्यात येत आहे. या अंतर्गत चिंचवडगाव परिसरात कालपर्यंत एक हजार १७६ गणेश मूर्तींचं दान तर चार टन निर्माल्य स्वीकारण्यात आलं. आठ क्षेत्रीय कार्यालयांमध्ये पथकं तयार करण्यात आली असून, प्लॅस्टर ऑफ पॅरिसच्या मूर्ती दान करण्याविषयी नागरिकांना आवाहन करण्यात येत आहे.

कोल्हापूर जिल्ह्यात साडे चार लाखपेक्षा अधिक मूर्ती पर्यावरणपूरक पद्धतीनं विसर्जित करण्यात आल्या. गेल्या अनेक वर्षांपासून कोल्हापुरात सुरू असलेल्या मूर्तिदान उपक्रमाला यावर्षीही नागरिकांनी उस्फूर्त प्रतिसाद दिला. निर्माल्य आणि मूर्ती दान करून पर्यावरणपूरक विसर्जन चळवळ वृध्दींगत केली.

पुण्यात कस्तुरे चौक गणेशोत्सव मंडळानं गणपती बघायला येणाऱ्या भाविकांना प्रसादासोबत देशी झाडांचे एक हजारपेक्षा जास्त बीज गोळे दिले. यासोबतच देशी झाडांच्या बिया देखील वाटण्यात आल्या. कार्यकर्त्यांनी देशी झाडांचं रोपण आणि संवर्धनाचा संकल्प करत दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांनाही त्याचं महत्त्व पटवून दिलं.

नांदेडमध्ये २५० गणेश मंडळांनी डीजे न वाजवण्याचं हमीपत्र दिलं असून, प्रशासनातर्फे या मंडळांचा गौरव करण्यात आला.

गणेशोत्सवानिमित्त नवी दिल्लीतल्या महाराष्ट्र सदनात मोफत आरोग्य तपासणी शिबिराचं  उद्घाटन आज, निवासी आयुक्त तथा सचिव श्रीमती आर. विमला यांच्या हस्ते करण्यात आलं. उद्या शिबिराचा शेवटचा दिवस आहे.

<><><><>

राज्य उत्सवांतर्गत आयोजित महाराष्ट्र राज्य उत्कृष्ट सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ स्पर्धेचा या वर्षापासून तालुकास्तरापर्यंत विस्तार करण्यात आला आहे. त्यामुळे यंदा जिल्हा तसंच राज्यस्तरांसोबतच तालुकास्तरीय पारितोषिकंही देण्यात येणार आहेत. राज्यभरातल्या ४०४ मंडळांनी या स्पर्धेत सहभाग नोंदवला असून, या सर्वांच्या सादरीकरणाचं परीक्षण सुरू आहे.

**<><><>**

अमेरिकन खुल्या टेनिस स्पर्धेत पुरुष दुहेरीत भारताचा युकी भांब्री आणि न्यूझीलंडचा मायकल व्हीनस या जोडीनं उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश मिळवला. त्यांनी उपउपांत्यपूर्व फेरीत जर्मनीच्या जोडीचा ६-४, ६-४ असा सरळ सेट्समध्ये पराभव केला. आता त्यांचा पुढचा सामना क्रोएशियाचा निकोला मेकटिच आणि अमेरिकेचा राजीव राम या जोडीशी होणार आहे.

पुरुष एकेरीत अग्रमानांकित यानिक सिनर, दुसऱ्या क्रमांकावर असलेला कार्लोस अल्काराज आणि २४ वेळा ग्रँडस्लॅम विजेता नोव्हाक जोकोविच यांनी पुढची फेरी गाठली. तर महिला एकेरीत मार्केटा वाँड्रुसोव्हा हिनं दुखापतीमुळे माघार घेतल्यानं अग्रमानांकित अरीना साबालेंका हिला पुढच्या फेरीत प्रवेश मिळाला.

**<><><>**

हवामान विभागानं आज रायगड, रत्नागिरी, सिंधुदूर्ग, पुणे घाट, जळगाव, अमरावती या जिल्ह्यांसाठी, तर उद्या या जिल्ह्यांबरोबरच सातारा घाट, कोल्हापूर घाट आणि नंदुरबार, धुळे आणि नाशिक या जिल्ह्यांना पावसाचा ऑरेंज अलर्ट दिला आहे.

**//<><><><>//**